# वसई विरार शहर महानगरपालिका

मा. स्थायी समिति सभा दिनांक २७/१०/२०१७

सभा सूचना क्र.-१७ दु ११.३० वा.

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि. १३/ १०/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. १३/ १०/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. सखाराम महाडिक सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावरील रहदारी/वाहतुक नियंत्रणासाठी दुसऱ्या टप्यात ५ नविन ठिकाणी सिग्नल यंत्रणा बसविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत. | ठराव :- वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावरील रहदारी/वाहतुक नियंत्रणासाठी दुसऱ्या टप्यात उपरोक्त नमुद ठिकाणी मे.सी.एम.एस.कॉम्प्युटर प्रा.लि. यांचे मंजूर निविदेतील दरानुसार सिग्नल यंत्रणा बसविणे व ५ वर्षे देखभाल दुरुस्ती करणे कामी येणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम तसेच म.रा.वि.वि.कंपनी कडून विद्युत कनेक्शन व फिडर पिलर कामी एकत्रित रक्कम ७१,२५,०००/- रु. खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.स्वप्नील बांदेकर सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ३. | महानगरपालिकेने स्थापन केलेल्या वसई विरार महापौर सहाय्यता निधी मध्ये महानगरपालिका फंडातून रक्कम वर्ग करणेकामी मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सादर केलेल्या प्रस्तावात नमुद केलेनुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या निधीमधून महापौर सहाय्यता निधीत रक्कम रु. २५ लक्ष इतकी रक्कम वर्ग करण्यांस आजची स्थायी समिती आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री.सखाराम महाडीक<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दि. २५/०९/२०१७ ते दि. ०१/१०/२०१७ व दि. ०२/१०/२०१७ ते दि.०८/१०/२०१७ या कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त मा.स्थायी समिती च्या माहितीसाठी | ठराव :- सदरबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. प्रस्तावातील माहिती व सभागृहातील चर्चा मा.स्थायी समिती सभेत अवलोकन केली व त्यानुसार संबंधितांने नोंद घेवून कार्यवाही करणेस सभेने एकमताने मंजुरी दिली.<br>अनुमोदक :- मा.श्री. कन्हैय्या भोईर सूचक :- मा.श्री. सुदेश चौधरी<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका